# ePaper राज्यावर पुढील 5 दिवस आस्मानी संकट; अतिवृष्टीचा इशारा



| वर्ष - 6 । अंक - 90 | UDYAM-MH-26-0158827 |

महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

**आतील पानांत**

- पुणे हादरलं! पहाटेच्या सुमारास भीषण अपघात
- पिंपरी-चिंचवड शिवसेनेतही 'भूकंप'!
- पुढच्या निवडणुकीत आमचे २०० आमदार निवडून आणू!

www.mahaenews.com | । मंगळवार । दिनांक 5 जुलै 2022 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews



संतोष बांगर हे हिंगोलीचे आमदार विधानसभा अध्यक्षपदाच्या निवडणुकीत शिवसेनेच्या बाजूने उभे राहिले व चोवीस तासांत असे काय घडले की, विश्वासदर्शक ठरावाच्या वेळी हे 'निष्ठावान' शिंदे गटाच्या कॅम्पात शिरले. आमदार म्हणून विजयी झाले तेव्हाही लोकांनी असे स्वागत केले नव्हते. तेच बांगर सोमवारी शिंदे गटात पळून गेले. त्यामुळे विश्वास फक्त पानिपतातच पडला असे नाही, तर प्रत्यक्ष महाराष्ट्रातही अनेक 'विश्वासराव' पळून गेले,"

-उद्धव ठाकरे, शिवसेना

महाराष्ट्रात आलेले शिंदे सरकार हे अवैध आहे, त्यांनी सत्ता जिंकली पण महाराष्ट्राचे मन मात्र त्यांना जिंकता आले नाही. तसेच बंडखोर आमदारांना फक्त पैसेच देण्यात आले नाहीत.पुढील निवडणुकांमध्ये जनता भाजपसाठी बुलडोझर ठरणार असल्याचेही म्हटंल आहे. तसेच अशाप्रकारे सूडबुद्धीने राजकारण करणारे सरकार आपण कधीही बघितले नाही.

- ममता बॅनर्जी, मुख्यमंत्री, प. बंगाल



## शॉर्ट न्यूज »

### 20 लाखांच्या खंडणीसाठी पाणीपुरी विक्रेत्याच्या मुलाचं अपहरण



**पिंपरी-चिंचवड ।** पाणीपुरी विक्रेत्याच्या मुलाचं अपहरण करून 20 लाखांची खंडणी मागणाऱ्या तीन जणांना हिंजवडी पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत. अपहरण झालेल्या 15 वर्षीय मुलाची सुखरूप सुटका करण्यात हिंजवडी पोलिसांना यश आले आहे. गंभीर बाब म्हणजे अपहरणाच्या कटात दोन अल्पवयीन मुलांचा समावेश असून त्यांना पोलिसांनी ताब्यात घेतलं आहे. आरोपीकडून तलवार, कोयता आणि पाच मोबाईल जप्त करण्यात आले आहेत. सनी शंकर कश्यप वय- 15 अस अपहरण होऊन सुखरूप सुटका झालेल्या मुलाच नाव आहे. या प्रकरणी त्याच्या आईने हिंजवडी पोलिसात अपहरण झाल्या प्रकरणी तक्रार दिली होती. लक्ष्मण नथुजी डोंगरे वय- 22, ज्ञानेश्वर सचिन चव्हाण वय- 22, लखन किसन चव्हाण वय- 26 यांना बेड्या ठोकण्यात आल्या असून दोन अल्पवयीन मुलांना ताब्यात घेण्यात आलं आहे. ज्ञानेश्वर चव्हाण हा मुख्य सूत्रधार असल्याचं पोलिसांनी सांगितले आहे.

### शहर भाजपाला फायदा : राज्यातील बदलत्या राजकारणाचा परिणाम

# भाजपातील बंडोबा झाले आता 'थंड'!

## माजी नगरसेवकांनी आता घेतली पक्षप्रवेशाबाबत 'वेट अ‍ॅन्ड वॉच'ची भूमिका

**। पिंपरी-चिंचवड । महाईन्यूज । प्रतिनिधी**

**राज्यातील** बदलल्या राजकीय समीकरणांचा परिणाम पिंपरी-चिंचवडमध्येही दिसत आहे. भाजपातील प्रचंड नाराज असलेल्या माजी नगरसेवकांनी आता पक्षप्रवेशाबाबत 'वेट अ‍ॅन्ड वॉच'ची भूमिका घेतली आहे. त्यामुळे आगामी निवडणुकीत भाजपाला फायदा होणार, असे चित्र निर्माण झाले आहे. २०१९ मध्ये महापालिकेत भाजपाची एकहाती सत्ता आल्यानंतर तत्कालीन शहराध्यक्ष व आमदार लक्ष्मण जगताप आणि विद्यमान शहराध्यक्ष व आमदार महेश लांडगे यांच्या कार्यपद्धतीवर नाराजी व्यक्त करीत भाजपातील सुमारे २५ जणांनी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीशी जवळीक केल्याचे बोलले जात होते. त्यापैकी माजी नगरसेवक वसंत बोराटे यांनी थेट प्रवेश करून भाजपातील अंतर्गत बंडाळीला वाट मोकळी करून दिली होती. विशेष म्हणजे, तत्कालीन उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या जाहीर कार्यक्रमांना हजेरी लावून भाजपाच्या स्थानिक नेत्यांविरोधात दंड थोपाटण्याची भूमिका माजी नगरसेवक रवि लांडगे, संजय नेवाळे, प्रियांका बारसे आदींनी घेतली होती. चिंचवड विधानसभा मतदार संघातील माजी नगरसेवक तुषार




कामठे, पिंपरी मतदार संघातील माजी नगरसेवक संदीप वाघेरे यांनी स्थानिक नेतृत्त्वाला आव्हान बंडखोरीचे संकेत दिले होते. तसे फोटोही सोशल मीडियावर व्हायरल झाले होते. माजी स्थायी समिती सभापती सीमा सावळे, आशा शेडगे यासुद्धा स्थानिक नेतृत्त्वावर प्रचंड नाराज असल्याचे सांगितले जाते. मात्र, राज्यातील महाविकास आघाडी सरकार कोसळले, तसे बंडखोरांनी 'वेट अ‍ॅन्ड वॉच'ची भूमिका घेतली.

अन्यथा भाजपातील सुमारे २५ नगरसेवक राष्ट्रवादीत प्रवेश करण्याच्या तयारी होते. मात्र, भाजपाच्या प्रतिकूल परिस्थितीत पक्षविरोधी भूमिका घेणाऱ्या माजी नगरसेवकांना भाजपा आता सत्तेसाठी 'रेड कार्पेट'देणार का? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

याउलट, राष्ट्रवादीसह शिवसेनेतील काही माजी नगरसेवक भाजपाच्या संपर्कात असून, आगामी काळात पिंपरी-चिंचवडमध्ये राजकीय भूकंप घडवून आणाणार आहोत. तसेच, आगामी निवडणुकीत भाजपा १०० हून अधिक जागा जिंकणार आहे, असा दावा भाजपाचे शहर संघटक अमोल थोरात यांनी केला आहे.

### प्रभाग रचनेत बदलाची शक्यता...

पिंपरी-चिंचवड महापालिकेत प्रशासक राजवट चालू आहे. महाविकास आघाडीतील सत्तेचा फायदा घेत राष्ट्रवादी, शिवसेनेला फायदेशीर प्रभाग रचना आणि मतदार याद्यांमध्ये हस्तक्षेप केल्याचा आरोप भाजपाकडून होतो. नव्या सरकारमध्ये भाजपाची भूमिका महत्त्वपूर्ण असल्यामुळे सध्या असलेली ३ सदस्यीय प्रभाग रचना बदलून भाजपाच्या हिताची ४ सदस्यीय प्रभाग रचना करण्याबाबत भाजपाचे स्थानिक नेते आग्रही आहेत. यासाठी 'ओबीसी आरक्षण'चा मुद्दा पुढे करण्यात येत आहे. नवनिर्वाचित उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पदाची शपथ घेतल्यानंतर पहिलीच बैठक 'ओबीसी आरक्षण'संदर्भात घेतली. त्यामुळे यावर शिक्कामोर्तब झाले आहे. त्यामुळे आगामी निवडणूक ३ सदस्यीय प्रभाग पद्धतीने होणार की, ४ सदस्यीय पद्धतीने होणार? याबाबत उत्सुकता निर्माण झाली आहे.प्रकृती स्वास्थ ठिक नसल्याने आता तिच जबाबदारी आमदार लांडगे यांच्याकड असणार आहे. आगामी लोकसभा निवढणुकिसाठी राष्ट्रवादीच्या ताब्यातील शिरुर मतदारसंघातून भाजपाचे उमेदवार म्हणूनही आमदार लांडगे यांच्याकडे पाहिले जाते.

### अजित गव्हाणेंसमोर मोठे आव्हान...

मावळत्या महाविकास आघाडी सरकारमधील प्रमुख सत्ताधारी पक्ष असल्यामुळे राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष अजित गव्हाणे यांचा वारु अत्यंत वेगाने निघाला होता. भाजपातील नाराजांची मोट बांधून भाजपाचे शहराध्यक्ष व आमदार महेश लांडगे यांच्यासह पिंपरी-चिंचवडमध्ये आव्हान उभा करण्यात येत होते. प्रभाग रचना आणि मतदार याद्यांमध्येही राजकीय हस्तक्षेप झाल्याचा आरोप भाजपाकडून करण्यात आला. मात्र, आता सत्तापालट झाले. भाजपा सत्ताधारी पक्ष बनला. त्यामुळे नाराजांनी साधव भूमिका घेतल्याचे बोलले जाते. आगामी निवडणुकीत भाजपामधील जागा निश्चित करुन सुरक्षितपणे महापालिका सभागृहात पोहोचण्याचा अनेकांचा मानस निर्माण झाला. त्यामुळे नाराजांच्या खांद्यावर बंदूक ठेवून राष्ट्रवादीला विजय खेचून आणण्याची महत्त्वाकांक्षा असलेल्या अजित गव्हाणे यांच्यासमोर मोठे आव्हान राहणार आहे.

## शॉर्ट न्यूज »

### धायेरवडा भागात लूटमार करणाऱ्या चोरट्यांना पकडले



**।पुणे। महाईन्यूज ।**

पुणे : येरवडा भागात लूटमार करणाऱ्या चोरट्यांना पोलिसांनी पकडले. चोरट्यांकडून मोबाइल संच आणि दुचाकी जप्त करण्यात आली. साजीद दिलावर सय्यद (वय २१), राजन रघुनाथ लावंड (वय २०), ओम विनोद भंडारी (वय २१, तिघे रा. माळवाडी, हडपसर) अशी अटक करण्यात आलेल्यांची नावे आहेत. येरवडा भागात कामावरुन जात असलेल्या एका तरुणाला अडवून त्याच्याकडील मोबाइल संच आणि रोकड असलेले पाकिट चोरट्यांनी हिसकावून नेले होते. या गुन्ह्याचा पोलिसांकडून तपास करण्यात येत होता. आरोपी हडपसर भागात असल्याची माहिती तपासात मिळाली. त्यानंतर पोलिसांनी चोरट्यांचा माग काढला. सय्यद, लावंड, भंडारी यांना अटक करण्यात आली.

येरवडा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक बाळकृष्ण कदम, गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक उत्तम चक्रे यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक अंकुश डोंबाळे, प्रदीप सुर्वे, दत्ता

### भरधाव ट्रकखाली बाईक चिरडली, आई आणि 6 महिन्याच्या बाळासह एकाचा मृत्यू

# पुणे हादरलं! पहाटेच्या सुमारास भीषण अपघात

## घटनेमुळे संपूर्ण परिसरात खळबळ, पोलीस तपास सुरू

**पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।**

पुण्यात आज पाहाटेच्या सुमारास भीषण अपघात झाल्याची घटना समोर आली आहे. पुण्याच्या मुळशी तालुक्यात हा अपघात झाला असून यामध्ये ३ जणांनी आपले प्राण गमावले आहे. मुळशी तालुक्यातील लवळेफाटा येथे ट्रक आणि दुचाकीचा भीषण अपघात झाला. या अपघातात तीन जणांचा जागीच मृत्यू झाला असून एकजण यात जखमी झाला आहे. या घटनेमुळे संपूर्ण परिसरात खळबळ उडाली असून पोलीस तपास सुरू असल्याची माहिती आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, या अपघातात रेश्मा (वय २५ ) या महिलेचा व त्यांचा मुलगा रिवांश पवन पटेल (वय ६ महिने ) या बालकाचा मृत्यू झाला असून महिलेचे पती पवन रमेश पटेल (वय ३२ वर्षे ) हे जखमी झाले आहेत तर नांदे गावचे रहिवासी तानाजी विठ्ठल ढमाले यांचा देखील या अपघातात दरम्यान मृत्यू झालेला आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, पुण्याहून पौडच्या दिशेने एक फरशीने भरलेला ट्रक क्रमांक एम एच १२ के आर ७७०६ हा जात असताना पिरंगुट जवळ ट्रकमध्ये तांत्रिक बिघाड झाल्याने ट्रकचे घाटात आल्यानंतर उताराच्या दिशेने रस्त्याने जाणाऱ्या तीन ते चार वाहनांना जोरात धडक दिली. मात्र, यात कोणतीही हानी झाली नाही.

मात्र, ट्रक लवळेफाटा इथे आल्यानंतर ट्रक चालकाने रस्त्याच्या डाव्या बाजूला वळवला. मात्र, त्या दिशेने जात असलेली दुचाकी ट्रकच्या खाली आली. दुचाकीवर असलेल्या पवन पटेल, पत्नी रेश्मा पवन पटेल, मुलगा रियांश पवन पटेल हे तिघेही बाईकवर होते. यावेळी पत्नी आणि मुलगा जागेवरच ठार झाले तर पटेल हे जखमी झाले. पवन पटेल यांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्यातच दुसऱ्या दुचाकीवर असलेले तानाजी विठ्ठल ढमाले हे देखील ट्रकखाली येऊन मृत्यू झाला.

सुदैवाने हा ट्रक ज्या ठिकाणी उभा राहिला त्या ठिकाणी बांधकाम चालू असल्याने त्या ठिकाणी वाळूचा ढिगारा होता. त्या वाळूच्या अडथळ्यामुळे हा ट्रक जागेवरच उभा राहिला व पुढील आणखी मोठा अनर्थ टाळला. तातडीने नागरिकांनी चालकाला पोलिसांच्या स्वाधीन केले. दरम्यान, पौड पोलीस ठाण्यात ट्रक चालक शशिकांत बाबू मांडवे याच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.



▶▶ या अपघातात रेश्मा (वय २५ ) या महिलेचा व त्यांचा मुलगा रिवांश पवन पटेल (वय ६ महिने ) या बालकाचा मृत्यू झाला असून महिलेचे पती पवन रमेश पटेल (वय ३२ वर्षे ) हे जखमी झाले आहेत तर नांदे गावचे रहिवासी तानाजी विठ्ठल ढमाले यांचा देखील या अपघातात दरम्यान मृत्यू झालेला आहे. याबाबत अधिक माहिती अशी की, पुण्याहून पौडच्या दिशेने एक फरशीने भरलेला ट्रक क्रमांक एम एच १२ के आर ७७०६ हा जात असताना पिरंगुट जवळ ट्रकमध्ये तांत्रिक बिघाड झाल्याने ट्रकचे घाटात आल्यानंतर उताराच्या दिशेने रस्त्याने जाणाऱ्या तीन ते चार वाहनांना जोरात धडक दिली. मात्र, यात कोणतीही हानी झाली नाही.



### व्यापाऱ्याच्या घरातील ६० तोळे दागिने चोरणाऱ्या तिघांना अटक

पुणे । पुण्यातील मार्केटयार्ड येथील व्यापाऱ्याच्या घरातील तब्बल ६० तोळ सोने-चांदीचे दागिने आणि काही रक्कम अशी एकूण ३० लाखांची चोरी करणाऱ्या तीन अट्टल चोरट्यांना बिबवेवाडी पोलिसांना अटक करण्यात यश आले आहे. मुस्तफा शकील अन्सारी (रा. ग्रीन पार्क कोंढवा), जुनेद रिजवान सैफ आणि हैदर कल्लू शेख असे अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावं आहेत.

परिमंडळ ५ च्या पोलीस उपायुक्त नम्रता पाटील यांनी दिलेल्या माहितीनुसार, बिबवेवाडी येथील सोबा सवेरा या सोसायटीमधील १० व्या मजल्यावर मार्केटयार्ड येथील एक व्यापारी राहतात. ते २० जून रोजी दुपारच्या सुमारास कुटुंबीयांसह बाहेर गेले होते. त्यावेळी आरोपी मुस्तफा शकील अन्सारी याने टेरेसवरील ग्रील तोडून घरामध्ये प्रवेश केला. त्यानंतर त्याने काही तासात सोने,चांदीचे दागिने आणि काही रक्कम अशी मिळून जवळपास ३० लाख रुपयांचा मुद्देमाल चोरून नेला.

# घर घेण्यासाठी पुणे दुसरे परवडणारे शहर, खासगी संस्थेच्या अहवालातील निरीक्षण

## मालमत्तांच्या किंमती वाढत असतानाच, रेपो दरामध्ये वाढ झाल्याने गृहकर्जातिही वाढ

**पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।**

मालमत्तांच्या किंमती वाढत असतानाच, रेपो दरामध्ये वाढ झाल्याने गृहकर्जातही वाढ झाली आहे. परिणामी घर खरेदी परवडण्याच्या क्षमतेत (ॲफोर्डेबिलिटी इंडेक्स) घट होत असून, बजेटनुसार हक्काचे घर शोधण्यास नागरिक प्राधान्य देत आहेत. त्यांच्यासाठी पुणे, अहमदाबाद आणि चेन्नई ही घर खरेदीसाठी सर्वात जास्त परवडणारी शहरे ठरत आहेत.

नाइट फ्रँक इंडिया संस्थेच्या जानेवारी ते जून २०२२ या पहिल्या सहामाही अहवालात हे



निरीक्षण नोंदविण्यात आले आहे. या अहवालात पुण्यासह मुंबई, दिल्ली-एनसीआर, बेंगळुरू, चेन्नई, हैदराबाद, अहमदाबाद आणि कोलकता या देशातील आठ प्रमुख शहरांमधील निवासी बाजारपेठांचा 'ॲफोर्डेबिलिटी इंडेक्स' (घर खरेदी परवडण्याची क्षमता) तपासण्यात आला. त्यामध्ये परवडणारी घरे असलेल्या शहरांच्या यादीत अहमदाबादने प्रथम क्रमांक पटकावला असून, त्यानंतर पुणे आणि चेन्नईने स्थान मिळविले आहे. महाराष्ट्राची राजधानी मुंबईत मात्र घर खरेदी परवडणारी नसल्याचे या यादीनुसार दिसते.

सरासरी कुटुंबासाठी 'इक्वेटेड मंथली इन्स्टॉलमेंट' (ईएमआय) आणि उत्पन्नाच्या गुणोत्तरानुसार 'ॲफोर्डेबिलिटी इंडेक्स' ठरविला जातो. करोनाच्या उद्रेकानंतर भारतीय रिझर्व्ह बँकेने रेपो दर दशकाच्या नीचांकी पातळीवर आणला होता. त्यामुळे पुण्यासह आठही प्रमुख शहरांमध्ये घर खरेदी परवडण्याच्या क्षमतेत वाढ झाली होती. त्यातून निवासी बाजारपेठेला सुगीचे दिवस आले होते. मात्र, गेल्या काही महिन्यांत रिझर्व्ह बँकेने सलग दोन वेळा रेपो दरात वाढ केल्याने ही क्षमता सरासरी दोन टक्क्यांनी कमी झाली आहे आणि गृहकर्जाच्या हप्त्यावरील (ईएमआय) भार ६.९७ टक्क्यांपर्यंत वाढल्याचे अहवालात नमूद आहे.

गृहकर्जांच्या व्याजदरांमध्ये ९० बीपीएसने वाढ झाल्यामुळे गेल्या काही महिन्यांपासून घर खरेदी परवडण्याची क्षमता घटली आहे. देशातील आठ प्रमुख निवासी बाजारपेठांमध्ये सरासरी घर खरेदी परवडण्याची क्षमता दोनशे ते तीनशे बेसिस पॉइंट्सने कमी झाली आहे. तरीही नागरिकांना घर खरेदी परवडत असून, स्वतःचे हक्काचे घर असावे, याबाबत त्यांची सकारात्मक मानसिकता आहे. त्यामुळे बाजारात मागणी आणि विक्री स्थिर राहण्याची अपेक्षा आहे.

### पुण्यात 'ॲफोर्डेबिलिटी इंडेक्स' 26 टक्क्यांवर

पुण्यात घर खरेदीसाठीचा 'ॲफोर्डेबिलिटी इंडेक्स' २०१० मध्ये ३९ टक्क्यांवर होता. तो २०१९ मध्ये २८ टक्क्यांपर्यंत सुधारला. २०२० मध्ये करोनाच्या उद्रेकानंतर हा निर्देशांक २६ टक्के आणि २०२१ मध्ये २४ टक्के होता. मात्र, आता हा निर्देशांक २६ टक्क्यांवर असून, परवडणारी घरे असलेल्या शहरांच्या यादीत पुणे दुसऱ्या स्थानावर आहे.

## शॉर्ट न्यूज

### गांजा विक्री प्रकरणी दोन महिलांवर गुन्हा दाखल

भोसरी । महाईन्यूज ।

। अमली पदार्थ विरोधी पथकाने बालाजीनगर झोपडपट्टीत कारवाई करून गांजा विक्री प्रकरणी दोन महिलांवर गुन्हा दाखल केला. ही कारवाई शनिवारी (दि. 2) दुपारी सव्वाबारा वाजता करण्यात आली. याप्रकरणी पोलीस नाईक विजय दौंडकर यांनी एमआयडीसी भोसरी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी महिलेने विक्रीसाठी गांजा बाळगला असल्याची माहिती अंमली पदार्थ विरोधी पथकाला मिळाली. त्यानुसार पोलिसांनी महिलेकडून 742 ग्रॅम वजनाचा 18 हजार 850 रुपयांचा गांजा जप्त केला. तो गांजा महिलेने दुसऱ्या महिलेकडून आणला असल्याचे तपासात निष्पन्न झाल्याने पोलिसांनी त्या महिलेविरोधात देखील गुन्हा दाखल केला आहे.

## महापालिका निवडणुकीत फटका बसणार ?

# पिंपरी-चिंचवड शिवसेनेतही 'भूकंप'!

## मुख्यमंत्री एकनाथ शिंदे समर्थक भाजपाच्या संपर्कात

। पिंपरी ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

राज्यातील सत्तांतरानंतराचे पडसाद पिंपरी-चिंचवडमध्येही दिसणार असून, शिवसेनेत दोन गटनिर्माण झाले आहेत. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना मानणारा एक गट भाजपाच्या संपर्कात असून, आगामी महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजपामध्ये प्रवेश करण्याची तयारी केली जात आहे. त्यामुळे शहर शिवसेनेत 'राजकीय भूकंप'ची पुनरावृत्ती होईल, अशी माहिती विश्वसनीय सूत्रांकडून मिळाली.

मावळत्या महाविकास आघाडी सरकारमधील शिवसेनेत एकनाथ शिंदे यांनी बंडखोरी केली. तब्बल सेनेचे तब्बल ४० आमदार फुटले. त्यामुळे आता राज्यात भाजपा-शिवसेना (शिंदे गट) असे सरकार स्थापन झाले आहे. मुख्यमंत्री



एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्याचा कारभार हाती घेतला आहे. त्यामुळे राज्यभरातील शिवसेनेत उभी फूट पडली असून, शिवसेनेचे स्थानिक नेते भाजपाच्या गळाला लागले आहेत.

दरम्यान, मावळचे शिवसेना खासदार श्रीरंग बारणे यांनी आपण मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्यासोबत असल्याचे जाहीर केले. तसेच, शिवसेनेच्या बैठकीलाही उपस्थिती दर्शवली. दुसरीकडे, शिवसेनेचे शिरुर लोकसभेतील माजी खासदार शिवाजीराव आढळराव यांच्यावर पक्षाने अगोदर कारवाई केली. त्यानंतर कारवाई रद्द करुन समजूत काढण्याचा प्रयत्न केला. मात्र, आढळराव पाटील यांनी अद्याप आपली भूमिका गुलदस्त्यात ठेवली आहे. त्यामुळे भोसरी विधानसभा मतदार संघासह आढळराव पाटील यांना मानणारा मोठा गट संभ्रमावस्थेत आहे. २०१९ मध्ये झाले महापालिका सार्वत्रिक निवडणुकीत शिवसेनेकडून ९ नगरसेवक निवडून आले आहेत. त्यापैकी ५ नगरसेवक भाजपाच्या संपर्कात आहेत. आगामी विधानसभा आणि महापालिका निवडणुकीचे गणित डोळ्यांसमोर ठेवून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या गोटातील नगरसेवक भाजपात प्रवेश करतील, असे सांगितले जात आहे. त्यामुळे भाजपाच्या तंबूत कोण दाखल होणार? हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.

### आधीच धुसफूस...त्यात राज्यात भूकंप...

पिंपरी-चिंचवड शहर शिवसेनेत अगोदर धुसफूस सुरू आहे. आता राज्यात राजकीय भूकंप झाल्यामुळे शहरातील शिवसेनेत दोन गट पडणार अशी स्थिती निर्माण झाली आहे. खासदार श्रीरंग बारणे आणि माजी गटनेता राहुल कलाटे यांच्यात मतभेद असल्याचे बोलले जाते. दुसरीकडे, शहर सेनेतील माजी खासदार आढळराव पाटील यांना मानणारा स्वतंत्र गट कार्यरत आहे. त्यामुळे शहरप्रमुख ॲड. सचिन भोसले यांना संघटना नियंत्रित करण्यासाठी तारेवरची कसरत करावी लागत आहे. माजी गटनेते राहुल कलाटे आणि जिल्हा संघटिका सुलभा उबाळे या मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या निकटवर्ती म्हणून ओळखल्या जातात. मात्र, अद्याप या दोन्ही नेत्यांनी शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या सोबत राहणार असल्याचे म्हटले आहे.

---

# जलवाहिनीच्या कामामुळे नागरिकांनी पर्यायी रस्त्याचा वापर करावा

## पाणीपुरवठा विभागाचे सह शहर अभियंता श्रीकांत सवणे यांचे आवाहन

। पिंपरी । महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

आंद्रा धरणातून पिंपरी-चिंचवडकरांसाठी पाणी आणण्यात येणार आहेत. त्यासाठी पिंगळे रोडवरील राधा स्वामी सत्संग न्यास ते चिखली-आकुर्डी परिसरात जलवाहिनी टाकण्यात येणार आहे. 5 जुलै ते 5 ऑगस्ट 2022 दरम्यान टप्पाटप्प्याने हे काम केले जाणार आहे. त्यामुळे या भागातील नागरिकांनी पर्यायी रस्त्याचा वापर करावा असे आवाहन महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाचे सह शहर अभियंता श्रीकांत सवणे यांनी केले.

भविष्यातील वाढीव लोकसंख्येस पाणीपुरवठा करण्यासाठी आंद्रा धरणातून



**भविष्यातील वाढीव लोकसंख्येस पाणीपुरवठा करण्यासाठी आंद्रा धरणातून पाणी कोटा मंजूर आहे. निघोजे येथे इंद्रायणी नदीतून अशुद्ध पाणी उपसा करुन चिखली येथील जलशुद्धीकरण केंद्रात शुद्ध करण्यात येणार आहे.**

पाणी कोटा मंजूर आहे. निघोजे येथे इंद्रायणी नदीतून अशुद्ध पाणी उपसा करुन चिखली येथील जलशुद्धीकरण केंद्रात शुद्ध करण्यात येणार आहे. चिखली जलशुद्धीकरण केंद्र ते देहू आळंदी बीआरटी रस्ता सोनवणे वस्तीपासून स्पाईन रोड येथे महापालिकेच्या अस्तित्वातील जलवाहिनीला नवीन 1100 मिली मीटर व्यासाची जलवाहिनी जोडण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

पिंगळे रोडवरील राधा स्वामी सत्संग न्यास ते चिखली-आकुर्डी रोड मार्गे रॉयल ग्रॅनाईट ते नेवाळे वस्ती कॉर्नर ते गणेश मंदीर नेवाळे मळा ते विनायक रेसिडेन्सी ते व्हिक्टोरीया स्कुल समोरील रस्ता ते साईप्रयाग सोसायटी नंबर 2 ते घरकुल भाजी मंडई रस्ता, साईसदन को ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी (इमारत क्रमांक सी-20) पर्यंत जलवाहिनी टाकण्यात येणार आहे. 5 जुलै ते 5 ऑगस्ट 2022 दरम्यान टप्प्या-टप्प्याने हे काम करण्याचे नियोजित आहे. त्यामुळे परिसरातील नागरिकांनी पर्यायी रस्त्याचा वापर करुन सहकार्य करावे असे आवाहन महापालिका प्रशासनाने केले.

# महापालिका प्रशासनाच्या जनसंवाद सभेकडे नागरिकांची पाठ

## जनसंवाद सभेत केवळ 70 नागरिकांनी सहभाग नोंदवून मांडल्या तक्रारवजा सूचना

। पिंपरी । महाईन्यूज ।

प्रशासनाच्या जनसंवाद सभेकडे आता नागरिक पाठ फिरवू लागले आहेत. महापालिकेच्या सर्व क्षेत्रीय कार्यालयांमध्ये आज (सोमवारी) जनसंवाद सभा पार पडली. आजच्या जनसंवाद सभेत केवळ 70 नागरिकांनी सहभाग घेऊन तक्रारवजा सूचना मांडल्या.

यात अ, ब, क, ड, इ, फ, ग आणि ह क्षेत्रीय कार्यालयामध्ये अनुक्रमे 8, 5, 5, 7, 9, 5, 23 आणि 8 नागरिकांनी जनसंवाद सभेत सहभाग घेऊन विविध तक्रारवजा सूचना मांडल्या. अ, ब, क, ड, ई, फ, ग, ह या क्षेत्रीय कार्यालयांच्या जनसंवाद सभेचे अध्यक्षपद मुख्य



समन्वय अधिकारी असलेले अनुक्रमे बीआरटीएसचे सह शहर अभियंता श्रीकांत सवणे, शहर अभियंता मकरंद निकम, भूमी आणि जिंदगी विभागाचे सहाय्यक आयुक्त प्रशांत जोशी, समाज विकास विभागाचेउप आयुक्त अजय चारठाणकर, सह शहर अभियंता सतीश इंगळे, अतिरिक्त आयुक्त उल्हास जगताप, उप आयुक्त चंद्रकांत इंदलकर, पर्यावरण विभागाचे सह शहर अभियंता संजय कुलकर्णी यांनी भूषवले.

## संपादकीय »

# कानामागून आले अन् तिखट झाले!

***महाराष्ट्राच्या राजकारणात अगदी अकल्पितपणे अस्तित्वात आलेल्या महाविकास आघाडीत नगरविकास मंत्री असलेले एकनाथ शिंदे यांची सुरुवातीपासूनची असलेली अस्वस्थता नेमकी हेरून भाजपने जी मेहनत घेतली, त्यात त्यांना अडीच वर्षांनंतर यश आले.***

एकनाथ शिंदे यांनी शिवसेनेत बंड करून आपल्या समर्थक आमदारांना घेऊन जेव्हा गुजरातमधील सुरत गाठली तेव्हाच यामागे भाजपचा हात असावा, अशी लोकांना शंका आली, पण भाजपचे नेते हा शिवसेनेचा अंतर्गत प्रश्न आहे, असे सांगूत हात झटकत राहिले, पण पुढे याच शिंदे समर्थक आमदारांनी सुरतहून भाजपशासित आसाममधील गुवाहाटी गाठले आणि तेथील अलीशान अशा हॉटेल रॅडिसनमध्ये तळ ठोकला तेव्हा मात्र शिंदेंच्या बंडामागे भाजपची प्रेरणा आणि सहाय्य असल्याचे दिसून आले. शेवटी शिंदे समर्थक आमदारांना भाजपशासित गोव्यात आणून त्यानंतर महाराष्ट्राच्या विधान भवनात आणण्यात आले, यासाठी केंद्र सरकारच्या सहकार्याने अभूतपूर्व अशी सुरक्षा व्यवस्था तैनात करण्यात आली. राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी जणू काही पूर्वनियोजित कार्यक्रमाप्रमाणे सगळ्याच प्रक्रियांना गतिमान करून सत्तास्थापनेचा दावा करणाऱ्या भाजपला बहुमत सिद्ध करण्याचा आदेश देऊन ३ आणि ४ जुलैला अधिवेशन घेण्यात आले आहे. या अधिवेशानात भाजपने विधानसभेचा अध्यक्ष आपला उमेदवार निवडून आणून विरोधात असलेल्या काँग्रेस, राष्ट्रवादी आणि शिवसेनेवर बाजी मारली. सोमवारी भाजप आणि शिंदे गटाला बहुमत सिद्ध करायचे आहे, आजची परिस्थिती पाहता बहुमत सिद्ध करण्याचे आव्हान भाजपसाठी अवघड नाही, असेच दिसत आहे. या एकूणच परिस्थितीत महाराष्ट्राच्या राजकारणात आजवर ज्यांनी अनेक अकल्पित प्रयोग घडवून आणले, महाविकास आघाडी अस्तित्वात आणली ते राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष आणि धुरंधर राजकीय नेते शरद पवार काही तरी चमत्कार करतील आणि जसे अजित पवारांचे बंड मोडून काढले तसे करतील,असे वाटत होते, पण त्यांना ते शक्य झालेले नाही. त्यामुळे सध्या तरी भाजपचे मुख्य नेते देवेंद्र फडणवीसांनी बाजी मारलेली आहे, पण फार वेळ शांत बसणे आणि विरोधात बसणे हा शरद पवारांचा स्वभाव नाही. भाजपने सध्या जरी बाजी मारली असली तरी ज्यांनी गेली अडीच वर्षे उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली महाविकास आघाडीचे सरकार पडावे यासाठी वेगवेगळ्या तारखा दिल्या आणि त्याचबरोबर ते पडण्यासाठी अनेकांना कामाला लावले.

## आनंदी सकाळ

# पुण्यवंतांना 'लक्ष्मीरूपी' संपन्नता लाभते...

सत्कर्म म्हणजे 'पुण्य'. पुण्यवंतांना 'लक्ष्मीरूपी' संपन्नता प्राप्त होते. या उलट दुष्कर्म म्हणजे 'अपुण्य'. अपुण्यवंतांच्या घरांत 'अलक्ष्मीरूपी' दारिद्र्य वास करते. मनुष्याने दारिद्र्यातून मुक्त होऊन, समृद्ध व पुण्यवंत व्हावे यासाठी लक्ष्मी 'अलक्ष्मीचे' रुप धारण करते.

मानवाने प्राप्त झालेल्या संपत्ती अथवा दारिद्र्य अवस्थेंचा सदुपयोग करावा; अन्यथा दोन्ही अवस्था दु:खाला कारणीभूत होतात. ज्याला शास्त्रकार 'नरकयातना' म्हणतात. एका रुपकातून हे समजावून घेऊ. दोन गृहस्थांची नरकात गांठ पडते. ते एकमेकांची विचारपूस करतात. गरीब विचारतो, 'तुम्ही कुठून आलांत? 'श्रीमंत म्हणतो, 'आम्ही श्रीमंतीतून आलो. आपण कोठून आलांत?' गरीब म्हणतो, 'दारिद्र्यातून आलो.' श्रीमंत म्हणतो, 'कांहो, आमच्या डोळ्यावर श्रीमंतीचा मद, संपत्तीचा उपयोग चैनीकडे केला, कशाचा देवधर्म? आम्ही धर्मबाह्य वागलो, स्वच्छंद आहार विहार केला. तुम्ही तर गरीब, तुम्ही इकडे कुणीकडे आलां?'

# याची देही याची डोळा, ऐसा देखिला सोहळा'



## भूमिका

गौरव जाधव

91 88051 21395



आषाढी वारी म्हणजे वारकऱ्यांसाठी परमोच्च आनंदाचा क्षण. संतांच्या संगतीत पांडुरंगाच्या भेटीला पंढरीला जाण्यासाठी वारकरी वर्षभर आषाढी वारीची आतुरतेने वाट पाहतात. हा सोहळा "याचि देही याची डोळा' अनुभवणे म्हणजे भाग्यच समजले जाते.

आज कदाचित आमचाच दिवस होता... आज दर्शन होणारच होते... आणि आम्हाला जेवढी ओढ देवाचं दर्शन घेण्याची होती... माऊलींची होती... कदाचित काय माउलींना पण आमची ओढ लागली होती वाटत आणि आम्हाला मध्ये शिरण्यास संधी मिळाली.... एवढ्या जवळ कि आता फक्त पंधरा मिनिट मध्येच आम्ही माउलींच्या पादुकांना स्पर्श करणार होतो... काय आनंद होता तो...

तासन तास रांगेत उभे असणारे ते भाविक... कोणताही लोभ नाही... लोभ फक्त एका गोष्टीचा... माउलींच्या दर्शनाचा... किती तरी लांब असणारी ती रांग... लहान, मोठे, वृद्ध, अपंग, सर्व प्रकारचे भक्त त्या रांगेत उभे होते... तिथे ना कुणी श्रीमंत होता ना कुणी गरीब... तिथं उभा असणारा प्रत्येक जण फक्त विठ्ठलाचा भक्त होता... माऊलींचा भक्त होता...

या वारीत प्रकर्षाने एक गोष्ट मला अशी जाणवली कि वृद्ध लोकांची संख्या जास्त होती... आपण असे म्हणू लगेच कि त्यांना काय कामं आहे... पण नाही उन्हात... भर पावसात... कुठे ही झोपायचं... कुठे ही जेवायचं... आणि दिवस दिवस चालत राहायचं... का करतात हे लोकं... घरात बसून मस्त आराम पण करू शकतात... निवांत घरात बसून खाऊ पिऊ शकतात... तरी पण का ते जातात.... हीच खरी भक्ती... आणि हेच खरे भक्त.... जिथे देवालाही ओढ लागत असेल अशा भक्तांची....

शेवटी खूप वर्षांची माझी इच्छा पूर्ण झाली... माउलींच्या पादुकांना स्पर्श करून माझं जीवन अगदी मंगलमय झाल्याचा आभास मला झाला.... आणि त्या आनंदात आम्ही आमचा परतीचा प्रवास सुरु केला....

धन्य आज दिन | झाले संतांचे दर्शन ॥१॥  
झाली पापातापा तुटी |  
दैन्य गेले उठाउठी ॥2॥  
झाले समाधान |  
पायी विसावले मन ॥3॥  
तुका म्हणे आले घरा |  
तोचि दिवाळी दसरा ॥4॥

(समाप्त)

# राज्यपालांच्या पेढ्याचा पवारांना राग का?

**शरद पवार राष्ट्रवादी पक्षाचे संस्थापक अध्यक्ष आहेत. महाराष्ट्रासह देशाच्या राजकारणात त्यांचा सहभाग कमालीचा असतो. 50 वर्षाहून अधिक काळ त्यांच्या राजकिय आयुष्याचा आहे.**

सत्तापदाचा काळ जास्तीत जास्त भोगणारं नेतृत्व ही त्यांची ओळख. ते बोलतात एक आणि करतात एक हा मुळ स्वभाव सर्वांना माहित. खरं तर त्यांच्या नेतृत्वावर काही लिखाण करण्याएवढी पात्रता आमच्या पेनाच्या शाईत नाही. पण अलीकडच्या काळात विशेषत: नव्या पिढीतले राजकारणी आपल्याच राज्यात त्यांना आवाहन देवु लागले. एव्हाना पराभुत करू लागले तर मग राग येणं शक्य आहे.

शरदचंद्र पवार कर्तेकरविता असलेलं महाविकास आघाडीचे सरकार पायउतार झालं. सत्तांतरानंतर राज्यात भाजपाने पुढाकार घेवुन एकनाथ शिंदे जे मुळ शिवसेनेचे यांच्यासोबत बनवलं. अर्थात भाजपाला मध्यावधी निवडणुका लादायच्या नको होत्या. अडीच वर्षाची महाविकास आघाडी ठाकरे सरकारची काळीकुट्ट राजवट ज्यामध्ये राज्यातील शेतकरी, सामान्य माणुस एवढेच नव्हे तर हिंदुत्व वेशीवर टांगुन केवळ सत्तेसाठी लांगुनचालुन करणारे सरकार



म्हणुन राजवटीचा लोकांना वैताग आला होता. ते घालवुन स्थिर सरकार यावं यासाठी एकनाथ शिंदेंनी पुढाकार घेवुन हिंदुत्व रक्षणाची भुमिका घेतली. ज्याला भाजपाने पाठिंबा दिला. अवघ्या पंधरा दिवसात राजकिय उलथापालथीनंतर एकनाथ शिंदे मुख्यमंत्री तर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस झाले. शरद पवारांना शह देवुन एवढ्या घडामोडीचा त्यांना राग येणे साहजिकच. नाही तरी पवार हे दुसरा पक्ष आणि नेत्यांच्या बाबत नेहमीच कोतं मन दाखवतात. काय तर म्हणे राज्यपालांनी शपथ देताना पेढा का भरवला? आणि 72 पासुन मला एकदाही पेढा मिळाला नाही. अतिथी देवो भव ही महाराष्ट्राच्या वारकरी संप्रदायाची परंपरा बाहेरून राज्यात आलेले राज्यपाल पालन करीत असतील तर त्यात चुक काय? व्यक्तिद्वेषाच्या टिकेतुन आपणही किती खुनशी याचं ओंगळवाणं दर्शन त्यांच्या रागातुन जनतेला पहायला मिळालं.

शरद पवार राष्ट्रवादी पक्षाचे संस्थापक अध्यक्ष आहेत. महाराष्ट्रासह देशाच्या राजकारणात त्यांचा सहभाग कमालीचा असतो. 50 वर्षाहून अधिक काळ त्यांच्या राजकिय आयुष्याचा आहे. सत्तापदाचा काळ जास्तीत जास्त भोगणारं नेतृत्व ही त्यांची ओळख. ते बोलतात एक आणि करतात एक हा मुळ स्वभाव सर्वांना माहित. खरं तर त्यांच्या नेतृत्वावर काही लिखाण करण्याएवढी पात्रता आमच्या पेनाच्या शाईत नाही. पण अलीकडच्या काळात विशेषत: नव्या पिढीतले राजकारणी आपल्याच राज्यात त्यांना आवाहन देवु लागले. एव्हाना पराभुत करू लागले तर मग राग येणं शक्य आहे. 2019 ला राज्यात भाजप-शिवसेना युतीला जनतेचा सत्ता करण्याचा अधिकार मिळाला होता.

## ।। अभंगवाणी ।।



पावलें पावलें तुझें आम्हां सर्व ।  
दुजा नको भाव होऊं देऊं ॥१॥  
जेथें तेथें तुझीं च पाउलें ।  
त्रिभुवन संचलें विठ्ठला गा ॥ध्रु.॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

## शॉर्ट न्यूज

### भुईबावडा, करुळ घाटात दरड कोसळली



।मुंबई ।महाईन्यूज ।

राज्यभरात सोमवारी सकाळपासून मुसळधार पावसाने हजेरी लावली आहे. पावसाचा जोर कायम असल्याने अनेक सखल भागांत पाणी साचले आहे. तसेच, राज्यातील घाटमाथ्यावरील परिसरात दरड कोसळण्याच्या घटना घडत आहेत. कोकणातील परशुराम घाटात दरड कोसळली असून, कोल्हापूर येथील भुई बावडा घाटात दरड कोसळली आहे. तसेच गगनबावडा राजापूर मार्गावर दरड कोसळली. त्यामुळे दरड कोसळल्याने वाहतुकीवर परिणाम झाला आहे. भुईबावडा व करुळ घाटात पडझड सुरु होत आहे. जेसीबीच्या साहाय्याने तात्काळ दगड माती बाजूला करुन वाहातूक सुरु ठेवण्यात आली आहे. करुळ घाटात अनेक ठिकाणी दरडीची माती दगड गटारात पडल्यामुळे गटारातील पाणी रस्त्यावरुन वाहात असून त्यामुळे रस्त्यावर दगडमाती येऊन रस्ता निसरडा झाला आहे.

### मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी स्वीकारले अजित पवारांचं आव्हान

# पुढच्या निवडणुकीत आमचे 200 आमदार निवडून आणू!

### 200 आमदार निवडून न आल्यास शेती करणार

।मुंबई ।महाईन्यूज ।

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विधानसभेत राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते अजित पवार यांना मी आणि देवेंद्र फडणवीस मिळून पुढील निवडणुकीत २०० आमदार निवडून आणू, असं प्रत्युत्तर दिलं. भाजपचे ११५ आणि माझ्या सोबतचे ५० असे एकत्र राहिल्यास पुढच्या निवडणुकीत २०० आमदार विजयी होऊ, असं एकनाथ शिंदे म्हणाले. जर, २०० जण निवडून आले नाहीत तर शेती करायला जाईन, असं एकनाथ शिंदे म्हणाले. अजित पवार यांनी अभिनंदन प्रस्तावावर बोलताना शिवसेनेत बंड झाल्यानंतर ज्यांनी बंड केलं ते निवडून येत नाहीत, असं म्हणाले होते. एकनाथ शिंदे यांनी अजित पवार यांना उत्तर देत आमचे २०० आमदार निवडून आणणार असं प्रत्युत्तर दिलं.

**तर आमची २०० लोक निवडून येतील**



हिंदुत्वाची ताकद एकत्र आली तर २०० लोक निवडून येतील. भाजपच्या हे केंद्रीय नेतृत्वाने ठरवलं. वेगळे राहिलो तर अजित दादांनी १०० प्लसचं टार्गेट ठरवलंच होतं, असं एकनाथ शिंदे म्हणाले. राष्ट्रवादीच्या त्या निर्णयानं आमच्या सगळ्यात चलबिचल होती. आमचे चंद्रकांत पाटील खडसेंच्या आणि पोलिसांच्या भीतीने सहा महिने बाहेरच आहेत. पण आता फडणवीस आणि मी आहोत, घाबरायचं कारण नाही असं त्यांना सांगितलं, असं एकनाथ शिंदे म्हणाले. माझं खच्चीकरण करण्यात येत होतं,

**आम्ही बंड नाही उठाव केलेला : एकनाथ शिंदे**

**थेट जिल्हाधिकाऱ्यांना फोन करुन प्रश्न सोडवणार**

सत्तेत शिवसैनिकाला काहीच मिळालं नाही. ते माझ्याकडे येऊन रडायचे. मी मोकळाच असल्यामुळे सगळ्यांचं ऐकायचो. या सर्वांना सांभाळायला पाहिजे होतं. सत्तेचा फायदा व्हायला हवा होता. मी एकट्याने माझ्याकडून झालं ते केलं. एकटा तरी काय करणार, एकट्याला मर्यादा येतात, असं एकनाथ शिंदे म्हणाले.

### एकनाथ शिंदे विधानसभेत मुलांच्या मृत्यूच्या आठवणीनं भावुक; नेमकं काय घडलं होतं?

कधीच रक्तपात होऊ देणार नाही, असंही एकनाथ शिंदे म्हणाले. एका मर्यादेपेक्षा जास्त कधीच सहन करता येत नाही. मुख्यमंत्री झालोय हेच मला अजून कळत नाही. लोक कागद घेऊन येतात, मी सही करत नाही, थेट कलेक्टरला फोन करतो, असं एकनाथ शिंदे म्हणाले.

### मुख्यमंत्री शिंदेंचा सूचक इशारा

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आपल्या सरकारच्या विश्वासदर्शक ठरावाच्या अभिनंदनपर भाषणात विरोधकांवर सडकून टीका केली. यावेळी त्यांनी शिवसेनेकडून आपला व समर्थक आमदारांचा होणारा 'गद्दार' असा उल्लेख करत आंदोलनं करणाऱ्यांवरही भाष्य केलं. "या ५० आमदारांपैकी प्रत्येकाकडे स्वतःचे १-२ हजार लोक आहेत. ते सर्व कार्यकर्ते दबंग आहेत, पण आम्ही ते शस्त्र बाहेर काढलं नाही," असा सूचक इशारा एकनाथ शिंदे यांनी दिला.एकनाथ शिंदे म्हणाले, "रोज तुम्ही शिवसैनिकांना आमच्याविषयी गद्दार गद्दार असं सांगता. आता काय आमचे पोस्टर वगैरे जाळून झाले आहेत. आता कोण जाळत नाही. आम्ही त्यावर कोठेही प्रतिक्रिया दिलेली नाही. शेवटी आम्ही ५० आमदार आहोत. प्रत्येकजण ७० हजार, ८० हजार, १ लाख, दीड लाख अशी मतं घेऊन निवडून आले आहेत. प्रत्येकाकडे स्वतःचे हजार दोन हजार लोक आहेत. ते सर्व कार्यकर्ते दबंग आहेत, पण आम्ही ते शस्त्र बाहेर काढलं नाही. कोणाशी लढायचं?"

### शहाजीबापू, अब्दुल सत्तार, भुमरे; अजितदादांचे 'चुन चुन के' चिमटे

# अजितदादांचे टोले, टोमणे आणि सल्ले, नाचणाऱ्या आमदारांना सुनावले!

### अजितदादांच्या निशाण्यावर पहिल्यांदा शहाजीबापू, अजितदादांचा भुमरेंवर 'नेम',अब्दुल सत्तार यांच्यावर 'बाण'

।मुंबई ।महाईन्यूज ।

नवनिर्वाचित मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, विरोधी पक्षनेते अजित पवार, शिवसेनेची तोफ भास्कर जाधव, शिंदे गटातील गुलाबराव पाटील यांच्या भाषणांनी आज विधानसभा अक्षरश: दणाणून गेली. एकाचं भाषण भारी झालं म्हणेपर्यंत दुसरा नेता आवेशपूर्ण, आक्रमक पण तितकंच वास्तविक परिस्थिती कथन करणारं भाषण करायचा. विरोधी पक्षनेते म्हणून नव्याने निवड झालेल्या अजितदादांनी तर दुसऱ्या दिवशीही तुफान बॅटिंग केली. मागील पंधरा दिवसाच्या काळातील सत्तासंघर्षात कोणकोण नेते कसेकसे वागले? याची स्टोरी सांगताना मिमिक्री करत अजितदादांनी शहाजीबापू, अब्दुल सत्तार, भुमरे यांना 'चुन चुन के' चिमटे काढले तर एकनाथ शिंदे यांची मुख्यमंत्री म्हणून निवड झाल्यानंतर डान्स करणाऱ्या आमदारांनाही दादांनी स्पष्ट शब्दात सुनावलं. 'काय झाडी, काय डोंगर, काय हॉटेल', हा शहाजीबापूंचा डायलॉग अख्ख्या राज्यात फेमस झाला. माणदेशी स्टाईलमध्ये आसामच्या निसर्गसौंदर्याचं वर्णन बापूंनी आपल्या कार्यकर्त्याजवळ केलं. पण हाच कॉल व्हायरल झाला आणि बापू राज्यात रातोरात फेमस झाले. आज विधानसभेत बोलताना अजित पवार यांनी पहिल्यांदा बापूंवरच नेम धरला. "काय बापू... काय झाडी.. काय डोंगर... काय हाटील... कसं हो बापू... आपण ९५ ला निवडून आलो. सोबत काम केलं.... अहो ही मोठी लोकं कधी एकत्र येतील, कळायचं पण नाही, तुम्ही राहाल पाठीमागे", असा टोला दादांनी बापूंना हाणला. शिंदे गटात आसामला असताना संदिपान भुमरे यांनी आपल्या एका कार्यकर्त्याला फोन केला. 'विरोधकांना जरा मिरच्या लागतील, अशा पोस्ट टाक', असं भुमरे आपल्या कार्यकर्त्याला म्हणाले. दादांनी त्याच फोन कॉलचा दाखला देत भुमरेंवर नेम धरला. "काय संदिपान... कशा पोस्ट सोडायच्या ... मिरच्या लागतील अशा ना....." असं दादा म्हणताच सभागृहात एकच हशा पिकला. "तुम्ही मंत्री होता, आपण एकत्र काम केलं आणि कार्यकर्त्याला मिरच्या झोंबतील अशा पोस्ट टाकायला सांगता होय... काय बोलू आता....." अशा संयत शब्दात अजितदादांनी भुमरेंचा समाचार घेतला.




### नाचणाऱ्या आमदारांना दादांनी सुनावलं


एकनाथ शिंदे यांची मुख्यमंत्री म्हणून फडणवीसांनी घोषणा करताच गोव्यात असलेले शिंदे गटाचे आमदार आनंदाने नाचू लागले. काही आमदार तर हॉटेलमधील टेबलवर चढून नाचले. प्रसारमाध्यमांनी आमदारांचा डान्स टेलिव्हिजनवर दाखवला. दादांना डान्सिंग आमदार चांगलेच खटकले. त्यांनी नाचणाऱ्या आमदारांचे कान उपटले. "सत्ता येत जात असते. पण असं वर्तन करणं ठीक नाहीये", अशा कडक शब्दात दादांनी डान्सिंग आमदारांना सुनावलं. आमदारांच्या वर्तनावर माफी मागणाऱ्या केसरकरांनाही दादांनी जाताजाता टोमणा हाणला. "शिंदे गटाचे प्रवक्ते केसरकर यांनी माफी मागितली कारण त्यांच्यावर राष्ट्रवादीचे संस्कार झालेले आहेत. ते संस्कार कुठेतरी कामाला आले", असं दादा म्हणाले.

### अजितदादांचा अब्दुल सत्तार यांच्यावर 'बाण'

अब्दुल सत्तार यांनीही ठाकरेंना चकवा देऊन सुरत गाठलं. त्यापूर्वी त्यांची अजित पवार यांच्याशी विधानभवनात भेट झाली होती. हाच धागा पकडत दादांनी तुफान टोलेबाजी केली. "काय सत्तार कुठे बिर्याणी खायला गेले होते... नेहमी पट्टीचे बोलणारे अब्दुल सत्तार सध्या शांत आहेत. फक्त एकदाच बोलले, बिर्याणी खायला जातोय. पण नंतर बिर्याणी पण काढली नाही. मंत्रिमंडळाचं स्थिरस्थावर होत नाही, तोपर्यंत जास्त बोलायचं नाही, अशी त्यांनी भूमिका घेतली आहे. सत्तार मला भेटले अन् थेट सुरत गाठली"

## शॉर्ट न्यूज »

### कोकण, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात मुसळधार पावसाची शक्यता



।मुंबई ।
महाईन्यूज ।प्रतिनिधी।

कोकण, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यातील काही जिल्ह्यांत पुढील चार दिवस मुसळधार ते अतिमुसळधार पाऊस पडण्याची शक्यता प्रादेशिक हवामान केंद्र, कुलाबा, मुंबई यांनी वर्तविली आहे. उत्तर कोकणातील मुंबई, ठाणे, रायगड, पालघर आणि दक्षिण कोकणातील सिंधुदुर्ग, रत्नागिरी जिल्ह्यातील काही भागात मुसळधार ते अतिमुसळधार पावसाची शक्यता आहे. उत्तर-मध्य महाराष्ट्रातील पुणे, नाशिक, नंदुरबार आणि दक्षिण मध्य महाराष्ट्रातील सातारा आणि कोल्हापूर जिल्ह्यातील घाट क्षेत्रात मुसळधार ते अतिमुसळधार पावसाची शक्यता आहे. तसेच दि. 5 जुलै रोजी मराठवाड्यातील औरंगाबाद, जालना, हिंगोली, परभणी, नांदेड, बीड, लातूर, उस्मानाबाद जिल्ह्यातील काही भागात 30-40 किलोमीटर प्रतीतास वेगाने वादळ वारा व विजेच्या गडगडाटासह मध्यम ते मुसळधार स्वरुपाचा पाऊस तर दि. 6 व 7 जुलै दरम्यान मुसळधार ते अतिमुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे.

## रशियानेही भारताच्या मागणीला पाठिंबा दिला

# रशिया भारताच्या पाठीशी खंबीरपणे उभा!

### चीनसमोर केली मोठी घोषणा

।नवी दिल्ली ।
महाईन्यूज ।प्रतिनिधी।

भारत संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेच्या) विस्ताराची मागणी करताना भारत आपल्या कायम सदस्यत्वाबाबत सातत्याने बोलत आहे. अशातच आता भारत संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेच्या स्थायी सदस्य आणि भारताचा जवळचा मित्र असलेल्या रशियानेही भारताच्या मागणीला पाठिंबा दिला आहे.

भारत संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेच्या विस्ताराची मागणी करताना भारत आपल्या कायम सदस्यत्वाबाबत सातत्याने बोलत आहे. अशातच आता भारत संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेच्या स्थायी सदस्य आणि भारताचा जवळचा मित्र असलेल्या रशियानेही भारताच्या मागणीला पाठिंबा दिला आहे. मोठी गोष्ट म्हणजे रशियाने चीनमध्ये झालेल्या ग्लोबल पीस फोरममध्ये भारताच्या स्थायी सदस्यत्वाला पाठिंबा दिला आहे.



संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेच्या विस्तारासाठी भारत आणि ब्राझीलच्या सदस्यत्वावर चर्चा करण्यास तयार असल्याचे रशियाने म्हटले आहे. त्याचवेळी रशियाने कायम सदस्यत्वाच्या मुद्द्यावर जर्मनी आणि जपानला पाठिंबा देण्यास नकार दिला आहे.

रशियाची अधिकृत वृत्तसंस्था टासने दिलेल्या वृत्तानुसार, चीनमधील रशियाचे राजदूत आंद्रे डेनिसोव्ह यांनी सोमवारी १० व्या ग्लोबल पीस फोरममध्ये या गोष्टी सांगितल्या. यासंदर्भात रशियन राजदूत म्हणाले की, ते भारत आणि ब्राझीलच्या सदस्यत्वाचे समर्थन करतात, परंतु, जर्मनी आणि जपानला कायमस्वरूपी जागा देण्याचे कोणतेही कारण दिसत नाही.

दरम्यान, "रशिया सर्वांच्या सहमतीच्या आधारे संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेचा विस्तार करण्याचे आवाहन करत आहे. संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेत आफ्रिकन, आशियाई आणि लॅटिन अमेरिकन देशांचा प्रमाणबद्ध वाटा वाढवण्याची गरज आहे. यामुळे युनायटेड नेशन्स अधिक लोकशाही संस्था बनतील आणि जगभरातील लोकांचे विचार समोर येतील", असे आंद्रे डेनिसोव्ह यांनी म्हटले.

"मी अगदी स्पष्टपणे सांगू इच्छितो की आम्ही UNSC मध्ये जर्मनी आणि जपानसारख्या देशांच्या प्रवेशाला पाठिंबा देण्यास तयार नाही. त्याला स्थायी सदस्यत्व दिल्याने UNSC मध्ये काही फरक पडेल असे आम्हाला वाटत नाही. परिषदेत प्रतिनिधित्वाच्या आधारे जो समतोल आहे, किंवा असमतोल आहे असे म्हणावे, तर ते या दोन देशांच्या (जर्मनी आणि जपान) सदस्यत्वामुळे बळकट होणार नाही. त्याऐवजी, जर हे देश स्थायी सदस्य झाले तर UNSC मधील प्रतिनिधित्व आश्चर्यकारकपणे असमतोल होईल. दुसरीकडे, आम्ही भारत आणि ब्राझीलच्या UNSC मध्ये सामील होण्यास समर्थन करतो", असे रशियन राजदूत यांनी म्हटले.

"रशियाची इच्छा आहे की खंडातील सर्व देशांना सुरक्षा परिषदेत योग्य रितीने प्रतिनिधित्व मिळावे. ते म्हणाले, 'आम्ही सातत्याने आवाहन करत आहोत की, शक्य तितक्या सर्वांनी UNSC मध्ये प्रतिनिधित्व केले पाहिजे. सर्व शक्यता असूनही, यूएन ही एक अद्वितीय संस्था आहे. आम्हाला हे व्यासपीठ जपायचे आहे आणि त्यात आणखी सुधारणा करण्याची आशा आहे", असे डेनिसोव्ह यांनी म्हटले. UNSC मध्ये रशिया, चीन, अमेरिका, ब्रिटन आणि फ्रान्स असे पाच स्थायी सदस्य आहेत. या पाच देशांना कोणत्याही मुद्द्यावर व्हेटोचा अधिकार आहे.

> संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेच्या विस्तारासाठी भारत आणि ब्राझीलच्या सदस्यत्वावर चर्चा करण्यास तयार असल्याचे रशियाने म्हटले आहे. त्याचवेळी रशियाने कायम सदस्यत्वाच्या मुद्द्यावर जर्मनी आणि जपानला पाठिंबा देण्यास नकार दिला आहे. रशियाची अधिकृत वृत्तसंस्था टासने दिलेल्या वृत्तानुसार, चीनमधील रशियाचे राजदूत आंद्रे डेनिसोव्ह यांनी सोमवारी १० व्या ग्लोबल पीस फोरममध्ये या गोष्टी सांगितल्या. यासंदर्भात रशियन राजदूत म्हणाले की, ते भारत आणि ब्राझीलच्या सदस्यत्वाचे समर्थन करतात, परंतु, जर्मनी आणि जपानला कायमस्वरूपी जागा देण्याचे कोणतेही कारण दिसत नाही.

# देशातील या 2 बड्या बँकांवर रिझर्व्ह बँकेची कारवाई

### रिझर्व्ह बँकेने कोटक महिंद्रा बँक लिमिटेडला ठोठावला 1 कोटींचा दंड

।नवी दिल्ली।
महाईन्यूज ।वृत्तसंस्था ।

भारतीय रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने (RBI) खाजगी क्षेत्रातील दोन मोठ्या बँकांना मोठी कारवाई केली आहे. रिझर्व्ह बँकेच्या मार्गदर्शक सूचनांकडे दुर्लक्ष केल्याने या दोन बड्या बँकांना 1 कोटींचा दंड ठोठावला आहे. रिझर्व्ह बँकेने कोटक महिंद्रा बँक लिमिटेडला 1.05 कोटी रुपये आणि इंडसइंड बँकेला 1 कोटी रुपयांचा दंड ठोठावला आहे.

रिझर्व्ह बँकेने दिलेल्या माहितीत, आरबीआयने ठरवून दिलेल्या नियमांचे पालन न केल्याने ही दंडाची कारवाई




करण्यात आली आहे. RBI ने 29 जून 2022 च्या आदेशात कोटक महिंद्रा बँकेला बँकिंग नियमांच्या तरतुदींचे उल्लंघन आणि ग्राहक संरक्षण मार्गदर्शक तत्त्वांचे पालन न केल्याबद्दल 1.05 कोटी रुपयांचा दंड ठोठावला आहे.

बँकिंग नियामकाच्या म्हणण्यानुसार, कोटक महिंद्रा बँक लिमिटेडवर बँकिंग नियमन कायदा, १९४९ (अधिनियम) च्या कलम २६अ मधील उप-कलम (२) च्या तरतुदींचे उल्लंघन केल्याबद्दल कारवाई करण्यात आली आहे. डिपॉझिटर एज्युकेशन अँड अवेअरनेस फंड योजनेच्या नियमांकडे दुर्लक्ष केल्याबद्दल बँकेला हा दंड ठोठावण्यात आला आहे.

नियमांचे पालन न केल्यामुळे इंडसइंड बँकेवरही अशीच कारवाई करण्यात आल्याचे रिझर्व्ह बँकेकडून सांगण्यात आले. RBI ने नो युवर कस्टमर (KYC) दिशानिर्देश, 2016 साठी जारी केलेल्या काही निर्देशांचे पालन करण्यात बँकेने निष्काळजीपणा केला आहे, ज्यामुळे बँकेला दंड आकारण्यात आला आहे. आरबीआयच्या या कारवाईमुळे ग्राहकांसोबत केलेल्या कोणत्याही व्यवहाराच्या किंवा कराराच्या वैधतेवर परिणाम होणार नाही.

# राज्यात 1515 नवे रुग्ण, तर 2062 रुग्ण कोरोनामुक्त

### राज्यासह देशभरात गेल्या अनेक दिवसांपासून कोरोनाच्या रुग्णांच्या संख्येत वाढ

।मुंबई ।
महाईन्यूज ।वृत्तसंस्था ।

राज्यासह देशभरात गेल्या अनेक दिवसांपासून कोरोनाच्या रुग्णांच्या संख्येत वाढ होत आहे. वाढत्या रुग्णांच्या पार्श्वभूमीवर आरोग्य यंत्रणा सतर्क झाली आहे. अशातच सोमवारी राज्यात 1 हजार 515 कोरोनाच्या नव्या रुग्णांची भर पडली आहे. तसेच, सर्वाधिक रुग्ण हे मुंबईतील आहे. मुंबईत सध्या 431 सक्रिय रुग्ण आहेत. याशिवाय सोमवारी दिवसभरात एकूण 2 हजार 062 रुग्ण कोरोनामुक्त होऊन घरी परतले आहेत.

राज्यात कोरोनामुळे तीन कोरोनाबाधित रुग्णांनी आपला जीव गमवावा लागला. त्यामुळे राज्यातील मृत्यूदर हा 1.85 टक्के इतका झाला आहे. तसेच, आतापर्यंत राज्यामध्ये 78 लाख 16 हजार 933 कोरोनाबाधित बरे होऊन घरी परतले आहेत. त्यामुळे कोरोना (Covid 19) रुग्ण बरे होण्याचं प्रमाण 97.87 टक्के इतके झाले आहे. शिवाय, राज्यात आज एकूण 21 हजार 935 सक्रिय रुग्ण संख्या आहे. त्यामध्ये मुंबईत सर्वाधिक म्हणजे 7 हजार 040 इतके रुग्ण आहेत.

# “माणसात देव असतो ऐकलं होतं अन्…”, उत्कर्ष शिंदेची



लोककलेची पिढीजात परंपरा यशस्वीरित्या सांभाळणारे आजचे आघाडीचे, प्रसिद्ध आणि लोकप्रिय गायक उत्कर्ष शिंदे येणार आहेत. उत्कर्ष शिंदे हा बिग बॉसमुळे प्रसिद्धीझोतात आला. उत्कर्ष शिंदे हा नेहमी काही ना काही कारणामुळे चर्चेत असतो. सध्या उत्कर्ष हा कामानिमित्ताने मारापूर गावात शूटींग करत आहे. नुकतंच त्याने या गावात शूटींग करतानाचा अनुभव सांगितला आहे.

उत्कर्ष शिंदे हा सोशल मीडियावर कायमच सक्रीय असतो. नुकतंच उत्कर्षने काही फोटो शेअर केले आहेत. यासोबत त्याने माणसात देव असतो ऐकलं होत काल देवाच दर्शन घडलं, अशा आशयाखाली एक पोस्ट शेअर केली आहे. त्याची ही पोस्ट सध्या चांगलीच चर्चेत आहे.

शूटिंग साठी आम्ही मंगळवेढे माझ्या गावा नजीक मारापूर येथे शूट करत होतो.संध्याकाळ झाली,सूर्य प्रकाश मंदावला होता .आऊटडोर म्हंटलं कि चाहते आलेच सर्वांना भेटून सर्व सांभाळत शूट सुरु होत आणि त्यातच पाऊस धो धो पडू लागला .कॅमेरा ,ड्रोन ,गिम्बल पावसात कसबस सांभाळत पॅक अप केलं .परत रिसॉर्ट वर पोहोचलो आणि सर्वांना ओढ लागली .मुंबई परतीची .सर्वजण बॅगपॅक करतच होतो कि कानी आवाज पडला “सर कॅमेराची लेन्सकिट कुठे सापडत नाहीये.सर्वांची शोधा शोध सुरु झाली.2

# “राजकीय क्षेत्रात काम करताना…”; उर्मिला मातोंडकरांनी सांगितलं पती मोहसिन यांची मिळाली साथ?



अभिनेत्री उर्मिला मातोंडकर यांनी आपले पती आपल्याला प्रत्येक गोष्टीमध्ये कशाप्रकारे पाठिंबा देतात याबाबत खुलासा केला आहे.

सुप्रसिद्ध बॉलिवूड अभिनेत्री आणि शिवसेना नेत्या उर्मिला मातोंडकर यांचा विवाहसोहळा २०१६मध्ये थाटामाटात पार पडला. त्यांनी व्यावसायिक आणि मॉडेल मोहसिन अख्तर मीरशी लग्न केलं. अभिनयक्षेत्रात स्वतःचं एक वेगळं स्थान निर्माण केल्यानंतर त्यांनी राजकीय क्षेत्रात प्रवेश केला. पण उर्मिला यांच्या प्रत्येक निर्णयामध्ये पती मोहसिन यांनी त्यांची साथ दिली. याचबाबत उर्मिला यांनी एका मुलाखतीमध्ये खुलासा केला आहे.

पिंक विलाला दिलेल्या मुलाखतीमध्ये उर्मिला यांनी आपलं पतीसोबत असणारं नातं तसेच त्यांचा आपल्याला असणार पाठिंबा याबाबत सांगितलं. “राजकीय क्षेत्रात काम करताना पती मोहसिन यांनी मला पाठिंबा दिला. ते मला पाठिंबा देत आहेत हे पाहून मलाही धक्काच बसला होता. प्रत्येकवेळी माझं मत सगळ्यांसमोर मांडण्याचं बळ, विश्वास त्यांच्याकडूनच मला मिळाला. याआधी कदाचित मी इतक्या आत्मविश्वासाने कधीच बोलली नसावी. म्हणूनच मी कायम म्हणते मुलगी, पत्नी आणि सून म्हणून मी स्वतःला नशिबवान समजेत.” असं उर्मिला यांनी यावेळी सांगितलं.

# ‘अनन्या’ चित्रपटातील रोमँटिक गाणे प्रदर्शित.. 'न कळता आज..'

शक्य आहे, तुम्ही जे ठरवाल ते शक्य आहे!’ असे म्हणणाऱ्या ‘अनन्या’चा ट्रेलर काही दिवसांपूर्वीच प्रदर्शित झाला होता. आता ‘अनन्या’ चित्रपटातील एक रोमँटिक गाणे सोशल मीडियावर झळकले आहे. हृता दुर्गुळे व चेतन चिटणीस यांच्यात खुलत जाणारे हळूवार नाते यात दिसत आहे. ‘न कळत’ असे या गाण्याचे बोल असून बेला शेंडेचा सुमधूर आवाज या गाण्याला लाभला आहे. तर अभिषेक खणकर यांनी हे गाणे शब्दबद्ध केले असून समीर साप्तीसकर यांनी गाण्याला संगीत दिले आहे. प्रताप फड दिग्दर्शित ‘अनन्या’ चित्रपट येत्या २२ जुलैपासून चित्रपटगृहात प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे. या गाण्यात एकमेकांविषयी असलेल्या तरल भावना व्यक्त करत एकमेकांना आयुष्यभर साथ देण्याचे वचन देत आहेत. प्रेमीयुगुलांच्या मनाला स्पर्श करणारे हे गाणे अतिशय श्रवणीय आहे.

चित्रपटाचे दिग्दर्शक प्रताप फड गाण्याविषयी म्हणतात, " हृता आणि चेतनवर हे गाणे चित्रित करण्यात आले असून अभिषेकने हे गाणे अगदी साध्या व सोप्या भाषेत मांडण्याचा प्रयत्न केला आहे.




# सिनी शेट्टीने पटकावला ‘MISS INDIA 2022’ खिताब

मुंबईच्या जिओ कन्व्हेन्शन सेंटरमध्ये ‘मिस इंडिया २०२२’ चा ग्रँड फिनाले आयोजित करण्यात आला होता. यानंतर भारताला नवी ‘मिस इंडिया २०२२’ मिळाली आहे. कर्नाटकची सिनी शेट्टी ‘मिस इंडिया २०२२’ची विजेता ठरली आहे. एका शानदार प्रक्रियेनंतर सिनी शेट्टी हिने ‘मिस इंडिया’चा मुकुट आपल्या नावावर केला. त्याचबरोबर, राजस्थानची रुबल शेखावतला मिस इंडिया २०२२ मध्ये फर्स्ट रनर अप घोषित करण्यात आले, तर उत्तर प्रदेशच्या शिनाता चौहान हिला सेकंड रनर अपचा मुकुट देण्यात आला.



यावर्षीच्या मिस इंडिया स्पर्धेत ३१ स्पर्धकांनी सहभाग नोंदवला होता. वेगवेगळ्या राज्यातील मॉडेल्स ‘मिस इंडिया २०२२’चा मुकुट आपल्या नावे करण्यासाठी मैदानात उतरल्या होत्या. यांच्या दरम्यान चुरशीशी स्पर्धा रंगली होती. आपल्या सौंदर्याने आणि बुद्धीने या सर्वच स्पर्धकांनी प्रेक्षकांना घायाळ केले. दरम्यान या संपूर्ण स्पर्धेत काही मॉडेल्सचे नाव चर्चेत राहिले. यामध्ये झारखंडच्या रिया तिर्की हिचा देखील समावेश आहे. काल ‘मिस इंडिया २०२२’च्या ग्रँड फिनालेमध्ये बॉलिवूडच्या अप्सरांनी देखील हजेरी लावली होती. या संपूर्ण इव्हेंटमध्ये मलायकानं आपल्या लुकनं सर्वांचं लक्ष वेधून घेतलं होतं. अनेकांनी तिच्या या लुकचं कौतुक केलं तर काहींना मात्र तिचा हा लुक अजिबात आवडलेला नाही. दरम्यान, नेहा धुपियाने सिल्व्हर गाऊनमध्ये दिसली. ब्लॅक अँड व्हाईट कलर आउटफिटमधला क्रिती सॅननचा लूकही खूपच सुंदर दिसत होता. मिस इंडिया २०२२ ग्रँड फिनालेमधील जजच्या पॅनेलमध्ये एक नव्हे तर सहा सेलिब्रिटींचा समावेश होता, ज्यामध्ये मलायका अरोरा, नेहा धुपिया, दिनो मोरिया, राहुल खन्ना, रोहित गांधी आणि शामक दावर जज म्हणून सामील झाले होते.

# दोन महिन्यात मुख्यमंत्री होतो ही नाही बघा.. 'तमाशा लाईव्ह'चा दमदार ट्रेलर..




गेल्या अनेक दिवसांपासून चर्चेत असलेला चित्रपट म्हणजे 'तमाशा लाईव्ह'. या चित्रपटाचे नावच इतके निराळे आहे की, या चित्रपटाविषयी मनात आपसूकच उत्सुकता निर्माण होते. त्यातच आता या चित्रपटाचा ट्रेलर प्रेक्षकांच्या भेटीला आला असून यात काहीतरी जबरदस्त आणि मनोरंजनात्मक दिसत आहे. 'तमाशा लाईव्ह'मध्ये सोनाली कुलकर्णी, सचित पाटील, सिद्धार्थ जाधव, हेमांगी कवी, पुष्कर जोग, नागेश भोसले, मृणाल देशपांडे, मनमीत पेम, आयुषी भावे, यांच्या प्रमुख भूमिका असून येत्या १५ जुलै रोजी हा भव्य चित्रपट सिनेमागृहात प्रदर्शित होणार आहे.

यापूर्वीच चित्रपटाच्या संगीताची रसिकांवर भुरळ पडली आहे. आता ट्रेलरही प्रेक्षकांना आवडत असून हा काहीतरी भन्नाट विषय असल्याचे दिसतेय. यात सचित पाटील आणि सोनाली कुलकर्णी वृत्तनिवेदकाच्या भूमिकेत आहेत. व्यावसायिक कारकिर्दीत आपण किती वरचढ आहोत, हे दाखवण्यात त्यांची चढाओढ सुरु असून त्यात 'ब्रेकिंग न्यूज'साठीची त्यांची धडपड, एकमेकांबद्दल असलेली ईर्षा यात अधोरेखित होत आहे. आता यातून आणखी काही 'ब्रेकिंग न्यूज' आपल्या समोर येणार का, हे 'तमाशा लाईव्ह' पाहिल्यावरच कळेल. याशिवाय राजकीय थरारही या चित्रपटात पाहायला मिळणार आहे. यात सिद्धार्थ आणि हेमांगीही महत्वपूर्ण भूमिकेत दिसत आहेत. ट्रेलरमध्ये दिसणारी गाणी कथा पुढे नेणारी आहेत. त्यामुळे या चित्रपटात काहीतरी वेगळे पाहायला मिळणार असल्याचे दिसतेय.

## शॉर्ट न्यूज »

### महिला विश्वचषक हॉकी स्पर्धा : भारत-इंग्लंड सामना बरोबरीत



**ॲमस्टेलव्हीन । महाईन्यूज**

पिछाडीवरुन पुनरागमन करत भारतीय संघाने महिला विश्वचषक हॉकी स्पर्धेत रविवारी इंग्लंडविरुद्धचा ब-गटातील सलामीचा सामना १-१ असा बरोबरीत सोडवला. इंग्लंडकडून इसाबेला पीटरने नवव्या मिनिटाला, तर भारताकडून वंदना कटारियाने २८व्या मिनिटाला गोल केला. भारताला पहिल्याच मिनिटाला पेनल्टी कॉर्नरला मिळाला; पण त्यांना गोल करता आला नाही. यानंतर पीटरने भारताच्या बचाव फळीला चकवत चेंडू गोल जाळ्य़ात मारला आणि इंग्लंडला आघाडी मिळवून दिली. मग २८व्या मिनिटाला भारताला पेनल्टी कॉर्नर मिळाला. यावेळी कटारियाने संधीचा फायदा घेत गोल करताना भारताला १-१ अशी बरोबरी साधून दिली.

भारत-श्रीलंका एकदिवसीय मालिका

# श्रीलंकेविरुद्ध दुसऱ्या सामन्यात ; भारताच्या सलामीवीरांवर नजर!

**।पालेकेले । महाईन्यूज ।**

श्रीलंकेविरुद्ध सोमवारी होणारा दुसरा एकदिवसीय क्रिकेट सामना जिंकत तीन सामन्यांच्या मालिकेत विजयी आघाडी घेण्याचे भारतीय महिला संघाचे लक्ष्य आहे. या सामन्यात भारताची सलामीची जोडी स्मृती मानधाना आणि शफाली वर्मा यांच्या कामगिरीवर सर्वांची नजर असेल.

श्रीलंकेविरुद्धच्या ट्वेन्टी-२० मालिकेत भारताने २-१ असा विजय नोंदवला होता. मग पहिल्या एकदिवसीय लढतीत भारताने चार गडी राखून सरशी साधत मालिकेत



१-० अशी आघाडी घेतली. मात्र सलामीवीर स्मृती आणि शफाली यांची कामगिरी भारतासाठी चिंतेचा विषय ठरली आहे. या दोघींनाही श्रीलंका दौऱ्यावर मोठी खेळी करता आलेली नाही. पहिल्या एकदिवसीय सामन्यात शफाली ३५, तर स्मृती अवघ्या चार धावांवर बाद झाली. त्यामुळे उर्वरित दोन सामन्यांत त्यांचा कामगिरीत सुधारणा करण्याचा प्रयत्न असेल.

कर्णधार हरमनप्रीत कौरने पहिल्या एकदिवसीय सामन्यात ४४ धावांसह संघाच्या विजयात महत्त्वाची भूमिका बजावली. तसेच ट्वेन्टी-२० मालिका आणि पहिला एकदिवसीय सामन्यात संघाच्या गरजेनुसार हरमनप्रीत गोलंदाजीतही निर्णायक कामगिरी केली. भारताच्या गोलंदाजांनी श्रीलंकेच्या धिम्या खेळपट्ट्य़ांवर चमक दाखवली आहे. पहिल्या सामन्यात रेणुका सिंगने श्रीलंकन फलंदाजांना अडचणीत आणले, तर ऑफ-स्पिनर दीप्ती शर्माने प्रभावी मारा केला.

दुसरीकडे, कर्णधार चमारी अटापट्टूकडून श्रीलंकेला चांगल्या कामगिरीची अपेक्षा आहे. त्यांच्याकडून हसिनी पेरेरा, हर्षिता समरविक्रमा आणि निलाक्षी डीसिल्वा यांनी मोठी खेळी करणे गरजेचे आहे. गोलंदाजीत डावखुरी फिरकी गोलंदाज इनोका रणवीराचे चमकदार कामगिरी केली. मात्र इतर गोलंदाजांनी तिला साथ देणे आवश्यक आहे.

> श्रीलंकेविरुद्धच्या ट्वेन्टी-२० मालिकेत भारताने २-१ असा विजय नोंदवला होता. मग पहिल्या एकदिवसीय लढतीत भारताने चार गडी राखून सरशी साधत मालिकेत १-० अशी आघाडी घेतली. मात्र सलामीवीर स्मृती आणि शफाली यांची कामगिरी भारतासाठी चिंतेचा विषय ठरली आहे. या दोघींनाही श्रीलंका दौऱ्यावर मोठी खेळी करता आलेली नाही. पहिल्या एकदिवसीय सामन्यात शफाली ३५, तर स्मृती अवघ्या चार धावांवर बाद झाली.



# विम्बल्डनच्या ‘सेंटर कोर्ट’ची शंभरी!

**मान्यवरांच्या उपस्थितीत एका कार्यक्रमाचेही आयोजन करण्यात आले होते. ‘**

**। लंडन । महाईन्यूज ।**

जगातील प्रतिष्ठित ग्रँडस्लॅमपैकी एक असलेल्या विम्बल्डन टेनिस स्पर्धेतील ‘सेंटर कोर्ट’ला रविवारी १०० वर्षे पूर्ण झाली. लंडनमधील चर्च रोड परिसरात असलेल्या ऑल इंग्लंड लॉन टेनिस संघटनेच्या ‘सेंटर कोर्ट’वर १९२२ पासून सामने खेळवले जात आहेत.

विम्बल्डन स्पर्धेतील रविवार हा परंपरेनुसार आरामाचा दिवस असतो. यंदा मात्र या नियमाला बाजूला सारत टेनिस सामने झाले आणि या दरम्यान ‘सेंटर कोर्ट’ची शंभरी साजरी करण्यासाठी अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत एका कार्यक्रमाचेही आयोजन करण्यात आले होते.

‘सेंटर कोर्ट’वर सामने खेळणे हे मानाचे मानले जाते. विम्बल्डनमधील मुख्य खेळाडूंचे, तसेच अंतिम फेरीचे सामने याच ‘सेंटर कोर्ट’वर खेळवले जातात. त्यामुळे रविवारी या कोर्टची शंभरी साजरी करण्यात आली, त्यावेळी रॉड लेव्हर, जॉन मॅकिन्रो, राफेल नदाल, गतविजेता नोव्हाक जोकोव्हिच, अँडी मरे, ख्रिस एव्हर्ट, सिमोना हालेप आदी दिग्गज आणि माजी विजेते खेळाडू उपस्थित होते.

पुरुषांमध्ये विक्रमी आठ वेळा विम्बल्डनचे जेतेपद मिळवणारा फेडरर दुखापतीमुळे यंदाच्या स्पर्धेत खेळत नसला, तरीही या कार्यक्रमात तो आवर्जून उपस्थित राहिला.

महाईन्यूज
जाहिरात आणि बातम्यांसाठी संपर्क
708 309 8763

महाईन्यूज नोंद असूद्या..
महाईन्यूजची डिजीटल आवृत्ती छपाईसाठी नाही